संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 628 /२०25
निशाणी क्रमांक 20

## फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ याचे प्रकरण एकवीस अन्वये संक्षिप्त संपरिक्षा

### मा. श्री.द.भा.डोमाळे, न्यायदंडाधिकारी प्रथमवर्ग, घोडनदी, ता.शिरुर, जि.पुणे यांचे न्यायालयात

१. अपराध घडल्याचा दिनांक :— दिनांक १५ / ०४ / २०२५

२. अहवालाचा किंवा फिर्यादीचा दिंनाक :— दिनांक १० / ०५ / २०२५

३. फिर्यादीचे नांव व पत्ता: — सौ. कविता राजेंद्र हिंगे
वय अंदाजे : ३५ वर्षे, धंदा - गृहिणी व शेती,
रा. गणेगाव खालसा, ता. शिरुर, जि. पुणे.

४. आरोपीचे नांव, वय व पत्ता:— प्रशांत आत्माराम साहाणे
वय: 40 वर्षे, व्यवसाय :
रा. ऋषिराज ज्वेलर्स, गाळा नं. 09, काळे कॉम्प्लेक्स, शिक्रापूर, ता. शिरुर जि. पुणे.

५. अपराधाचा तपशिल :

तुम्ही आरोपीने फिर्यादी यांना देणे असलेल्या रक्कमेची अंशत: अथवा पूर्णत: परतफेड करणेकरीता दिनांक 23/01/2025 रोजीचा धनादेश क्रमांक 000537 हा रक्कम रुपये 4,25,000/- इतक्या रकमेचा दिला. सदरचा धनादेश हा फिर्यादीने त्यांचे बॅंकेतील खात्यामध्ये जमा केला असता दिनांक 24/01/2025 रोजी 'फंड इनसफिशीयंट' असा शेरा मारुन न वटता परत आला. त्याबाबत फिर्यादीने तुम्ही आरोपीस दिनांक 20/03/2025 रोजी नोटीस पाठविली. सदर नोटीसची माहिती दिनांक 29/03/2025 रोजी तुम्हाला प्राप्त झाली. त्यानंतर पंधरा दिवसांच्या आत तुम्ही आरोपीने धनादेशामधील नमुद रक्कम ही फिर्यादीस दिली नाही अथवा सदर रक्कमेची परतफेड फिर्यादीस केली नाही. त्यामुळे तुम्ही परक्राम्य संलेख अधिनियम,१८८१ चे कलम १३८ अन्वये गुन्हा केला आहे.

04/08/2025

(द. भा. डोमाळे)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी-शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे.

संक्षिप्त फौजदारी खटला क्र. 628 /2025
निशाणी क्रमांक – 20

**आरोपीचे प्रतिकथन** :–

**प्रश्न क्र.१** :– तुम्हाला फिर्यादीच्या कागदपत्रांच्या नकला मिळाल्या काय?

**उत्तर** :– **होय.**

**प्रश्न क्र.२** :– तुम्हाला आता तुमचे विरुद्धचा आरोपाचा तपशिल मातृभाषेमध्ये वाचून दाखविला तो तुम्हाला समजला काय?

**उत्तर** :– **होय**

**प्रश्न क्र.३** :– तुम्हाला गुन्हा कबुल आहे काय?

**उत्तर** :– **नाही.**

ठिकाण :– घोडनदी.

दिनांक :– 08/08/2026

..................................
आरोपीची सही

समक्ष

04/09/2026

**(द. भा. डोमाळे)**
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
घोडनदी–शिरुर, ता. शिरुर, जि.पुणे.